मार्गदर्शक सूचना

जा.क्र. कृससं/विप्र-२/भ-मा /३०३/२०१३
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५. दिनांकः- २४/०५/२०१३

प्रति,

1) **विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)**
2) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**विषय - भरडधान्य उत्पादन कार्यक्रम - २०१३-१४ मार्गदर्शक सूचना**
**Initative for Nutritional Security through Intensive Millet Program (INSIMP)**

संदर्भ -१) केंद्र शासनाचे कार्यक्रम मंजूरी पत्र क्र. सीपीएस- ७ -१/२०१३ एनएफएसएम (एम) दि. १३ मे २०१३

२) केंद्र शासनाच्या मागदर्शक सुचना २०१३-१४ " **www.nfsm.gov.in** " या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

भरडधान्यामधील उत्पादकता वाढावी या हेतूने भरडधान्य विकास योजना केंद्र शासनाने सन २०११-१२ या वर्षामध्ये सुरू केली असून सन २०१३-१४ मध्ये सदर योजना चालू ठेवण्यांस केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे. जिल्हा निहाय, पिक निहाय दिलेल्या लक्षांकानुसार कार्यक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक ते नियोजन करण्यात यावे, यामध्ये कार्यक्षेत्र निवड, पायाभूत सर्वेक्षण, लाभार्थी निवड, लाभार्थी प्रशिक्षण, तांत्रिक बळकटीकरण, निविष्ठा उपलब्धता नियोजन, निविष्ठा मागणी नोंदविणे इत्यादी बाबींचे नियोजन दिलेल्या वेळापत्रकानुसार तातडीने करण्यात यावे.
यामध्ये योजना अंमलबजावणी करतांना सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये ज्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे त्या लाभार्थींना पुनश्चः लाभ देण्यात येवू नये.

**समाविष्ट पिकेः-**

खरीप ज्वारी, बाजरी, रागी, रब्बी ज्वारी, बटकी, कुटकी, कोद्रा, वरई, व राळा

**उद्देशः-**

अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित पीक उत्पादन प्रात्यक्षिके आयोजित करणे, तसेच पीक उत्पादन मूल्यवृध्दीसाठी काढणी पश्चात तंत्रज्ञानाची सांगड घालून उत्पादकास जास्तीत जास्त शाश्वत पध्दतीने फायदा मिळवून देणे.

www.mahaagri.gov.in

बाबनिहाय कार्यक्रम

| अ.क्र. | बाब | भौतिक | आर्थीक(रु. लाख) |
|---|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा (हे) | १२६००० | ३७७०.०० |
| २ | प्रात्यक्षिकासाठी बियाणे (मिनीकीट संख्या) | १२६००० | २७६.०० |
| ३ | प्रात्यक्षिकासाठी तांत्रिक सहाय्यक (संख्या) | १४० | ६७.२० |
| ४ | प्रशिक्षण (संख्या) | २८० | ६५.६० |
| ५ | बियाणे उत्पादन कार्यक्रम (किंटल) | ४६०० | ४६.२० |
| ६ | काढणी पश्चात तंत्रज्ञान व मूल्यवृध्दी (संख्या) | १०० | ४००.०० |
| ७ | काढणी पश्चात तंत्रज्ञान व मूल्यवृध्दी तांत्रिक | १०० | ६४.०० |
| ८ | प्रचार प्रसिध्दी व विपणन व्यवस्थापण | | ६३.०० |
| ९ | कार्यालयीन खर्च | | ४८.०० |
| **एकूण** | | | **४८००.००** |

**१) मुलभूत सर्वेक्षण करणे.**

**उत्पादन व उत्पादकता आधारीत प्रकल्पांची निवड व प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींचे मुलभुत सर्वेक्षण करण्यात यावे**

- निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्राचा तपशील प्रकल्पात दर्शविणे.
- पीकनिहाय व वाणनिहाय क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता प्रकल्पात दर्शविणे.
- जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाष व सुक्ष्ममुलद्रव्ये यांचा तपशील प्रकल्पात दर्शविणे
- उपलब्ध ट्रॅक्टर/पॉवर टीलर/बैल जोडी संख्या तसेच औजारे निहाय प्रकल्पातील उपलब्धता
- पीकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण व शिफारस प्रमाणे मात्रा व प्रत्यक्षात वापराचा तपशील
- उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ सर्व्हिस प्रोव्हायडरची संख्या व सेवेचा तपशील
- निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच तयार झालेल्या कृषि मालाची पणन व्यवस्था
- शेतकरी समुह/गटाची निवड करणे व प्रकल्पात सहभागी होण्याकरीता त्यांची संमती घेणे.

वरील सर्व मुद्दयांवर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास जि.अ.कृ यांनी मान्यता दिल्यावर अंमलबजावणी सुरु करावी.

**२) प्रकल्प तयार करणे**

उपरोक्त बाबींचा विचार करुन ज्वारी व बाजरी मध्ये ५०० हेक्टर क्षेत्राचा आणि रागी (नाचणी) मध्ये २५० हेक्टर क्षेत्राचा व इतर भरड धान्य मध्ये १०० हेक्टर क्षेत्राचा प्रकल्प आराखडा तयार करावा व क्षेत्र व उत्पादकता वाढीचे लक्षांक ठरविण्यात यावेत व त्याचे नियोजन करण्यात यावे. लक्षांक ठरविताना सर्वात जास्त साध्य झालेली उत्पादकतेपेक्षा १५ टक्के जास्त प्रमाणात लक्ष निर्धारीत करण्यात यावे.

1) सर्व प्रकल्प शेतक-यांचे गट करुन गटामार्फत कार्यक्रम राबविण्यास बंधनकारक करण्यात यावेत. आत्मा योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या गटांना प्राधान्य देण्यात यावे.

www.mahaagri.gov.in

2) सर्वसाधारणपणे प्रत्येक २० हे. मागे एक गटप्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी म्हणजेच ज्वारीयबाजरी पिका करिता एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण २५ गट, नागली पिका करिता १३ गट व इतर भरड धान्या करिता ५ गट तयार करुन त्याचे प्रत्येकी १ प्रमाणे अनुक्रमे २५,१३ व ५ गटप्रमुखांची निवड करण्यात यावी.

3) गट प्रमुखांच्या सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे. तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ व महाराष्ट्र लघु उदयोग विकास महामंडळ यांचे क्षेत्रिय अधिका-यांशी संपर्क साधुन निविष्ठांचा पुरवठा कोणत्या ठिकाणी करावयाचा आहे याची माहीती दयावी व निविष्ठा पुरवठयाचे नियोजन करण्यात यावे. प्रकल्पातील संपुर्ण क्षेत्रासाठी निविष्ठांचा तपशील व त्याची उपलब्धता देण्यात यावी.

4) प्रत्येक प्रकल्प हा विशेष कार्य आधारभुत घेवून अंमलबजावणी करणेचा आहे. विशेष कार्यानुसार प्राथमिक प्रशिक्षण (विस्तार कार्यप्रणाली) ठरविणेत यावी. हंगामपुर्व प्रशिक्षणामध्ये राबवावयाच्या कार्यक्रमा बाबत माहीती दयावी तसेच तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन करावे. तसेच पुरवठा करण्यात येणा-या निविष्ठांचे वाटपा बाबतचे वेळापत्रक शेतक-यांना अवगत करुन देण्यात यावे.

५) बियाणे उत्पादन, बियाणे वाटप, सुक्ष्ममुलद्रव्ये व्यवस्थापन, शेतकरी शेतीशाळा इ. कार्यक्रम राबविण्यासाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना सोबत देण्यात आलेल्या आहेत.

**३) पीक प्रात्यक्षिके आयोजन करणे**

केंद्र शासनाचे प्रस्तावीत मंजूर कार्यक्रमानुसार जिल्हा निहाय, पीक निहाय लक्षाक निश्चित करण्यात येत आहे. त्यास अनुसरुन पिक प्रात्यक्षिके या बाबी अंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी २८० गटामध्ये कार्यक्रम अंमलबजावणीचे नियोजन करण्यांत आले आहे. भरडधान्याची गट स्वरुपात पीक प्रात्यक्षिके आयोजन करण्यात यावी. केंद्र शासनाच्या उपरोक्त प्रस्तावीत कार्यक्रमाच्या अनुषंगाने सदरचा कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

प्रात्यक्षिकांसाठी य़ोजने अंतर्गत आवश्यक असणा-या निविष्ठांचे उदा. रा.खते, जौविक खते, सुक्षम मुलद्रव्य, किटक नाशके, बियाण्यांचे ई.आयुक्त स्तरावर निश्चित केलेल्या पॅकेज प्रमाणे निविष्ठांची खरेदी/मागणी नोंदविण्या करिता व सनियंत्रण करण्याकरिता विभागीय कृषी सहसंचालक यांचे अध्यक्षते खाली पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे,

| | |
|---|---|
| 1) विभागीय कृषी सहसंचालक | अध्याक्ष |
| 2) संबधीत जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | सदस्य सचिव |
| 3) कृषी विद्यापीठाचे संबधीत विषयाचे शात्रज्ञ | सदस्य |
| 4) बियाणे महामंडळ, एनएससी, कृषी उद्योग,मार्कफेड या पुरवठादार संस्थांचे स्थानिक प्रतीनिधी | सदस्य |

सर्व निविष्ठांची मान्यते नुसार पुरवठादार संस्थेकडे मागणी नोंदविण्यात येऊन त्याची एक प्रत आयुक्तालयास सादर करावी. सर्व निविष्ठा व आवजारे वेळेत उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबधीत उप विभागीय कृषी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व विभागीय कृषी संचालक

www.mahaagri.gov.in

याची राहील. कोणत्याही परिस्थीतीत पुरवठा केलेल्या निविष्ठा विना वितरण पडून राहाणार नाहीत याची दक्षता संबधीत विभागीय कृषी संचालक यांनी घ्यावी.

पिक प्रात्यक्षिकासाठी अर्थिक मापदंडाचे मर्यादेत कृषि विदयापीठाच्या शिफारशीनुसार आयुक्त स्तरावर निश्चित केलेल्या पॅकेज प्रमाणे अनुदानावर निविष्ठा लाभार्थीना पुरवठा करण्याचे आहेत. त्याचा पिकनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ) प्रात्याक्षिकासाठी आवश्यक निविष्ठा १०० टक्के किंवा केंद्र शासनाने विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेत अनुदानावर पुरवठा करण्याच्या आहेत. केंद्र शासनाने विहीत केलेली पिक निहाय प्रति हेक्टर आर्थिक मर्यादा ज्वारी, बाजरी, रागी रू ३०००/- व इतर भरडधान्य रू २०००/-प्रमाणे आहे.

ब) प्रात्याक्षिकासाठी आवश्यक असलेले निविष्ठा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मार्कफेड व महाबीज यांचेकडुन उपलब्ध करुन घ्याव्यात.

क) कोरडवाहू शेती अभियानअंतर्गत गावाची निवड प्रथम प्राधान्याने करावी.

ड) प्रकल्पातील लाभार्थि शेतकरी हा शेतकरी मासिकाचा वर्गनीदार होणे अनिवार्य आहे.

इ) गावाची निवड करतांना ज्या गावचे जमीन आरोग्य पत्रिका निश्चीत केलेली आहे अशी गावे प्रथम प्राधान्याने निवडावी.

ई) आत्मा अंतर्गत निर्माण केलेल्या गटाची निवड करावी.

**४) प्रात्यक्षिकासाठी गट निवड**

केंद्र शासनाकडुन पिक निहाय सन २००६-०७ मधील उत्पादकतेच्या आधारे जिल्हानिवड केलेली असुन

जिल्हानिहाय गटसंख्या अंतिम करण्यात आलेली आहे. जिल्हयामध्ये गट निवडतांना सर्व समाविष्ठ तालुका विचारात घेवुन जास्ती क्षेत्राच्या तालुक्यास प्रथम प्राधान्य या प्रमाणे तालुका (गट) निवड करण्यात यावी.

पिकनिहाय, जिल्हानिहाय मंजूर गट संख्या विचारात घेवून विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हयासाठी मंजूर असलेल्या गटसंख्ये नुसार सन २००६-०७ मधील सांख्यिकी विभागाकडील तालुकानिहाय पिकाखालील जास्त क्षेत्र व कमी उत्पादकता ही बाब विचारात घेऊन प्रात्याक्षिक गट अंतिम करणेत यावेत.

**५) प्रात्याक्षिकाचा मंजूर कार्यक्रम**

| अ.क्र | पिके | निवड गट संख्या | गटाचा आकार हेक्टर मध्ये | एकुण क्षेत्र | निविष्ठा साठी मंजुर रक्कम रु लाख |
|---|---|---|---|---|---|
| १ | खरीप ज्वारी | ५० | ५०० | २५००० | ७५०.०० |
| २ | रब्बी ज्वारी | १०० | ५०० | ५०००० | १५००.०० |
| ३ | बाजरी | ८० | ५०० | ४०००० | १२००.०० |
| ४ | रागी नागली) | ४० | २५० | १०००० | ३००.०० |
| ५ | इतर भरड धान्य | १० | १०० | १००० | २०.०० |
| **एकुण** | | **२८०** | | **१२६०००** | **३७७०.००** |

**खरीप ज्वारी**

राष्ट्रीय सरासरी उत्पादकता २००६/०७ - ९९२ किलो / हेक्टर (गटाचा आकार ५०० हेक्टर)

| अ.क्र | जिल्हा | क्षेत्र हे. | उत्पादकता कि./हे. | गटसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नंदूरबार | २८,२०० | २६८ | ४ |
| २ | सातारा | ५९,३०० | ६३४ | ०४ |
| ३ | सांगली | ११३,९०० | ७५८ | ०८ |
| ४ | उस्मानाबाद | ७२,९०० | ७३३ | ०६ |
| ५ | नांदेड | १७०,१०० | ९५३ | १६ |
| ६ | परभणी | ८८,४०० | ८८० | ०६ |
| ७ | यवतमाळ | ८३,५०० | ९८२ | ०४ |
| ८ | वर्धा | १५,६०० | ८९३ | ०२ |
| | **एकूण** | | | **५०** |

रब्बी ज्वारी

राष्ट्रीय सरासरी उत्पादकता २००६/०७ - ७२७ किलो / हेक्टर (गटाचा आकार ५०० हेक्टर)

| अ.क्र | जिल्हा | क्षेत्र हे. | उत्पादकता कि./हे. | गटसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सांगली | १३९,६०० | ५८७ | ७ |
| २ | बीड | २५१,१०० | ७१२ | १० |
| ३ | हिंगोली | २०,९०० | ५६५ | ०२ |
| ४ | नाशिक | १२,००० | ७०० | ०१ |
| ५ | अहमदनगर | ५२८,४०० | ५१९ | २२ |
| ६ | पुणे | ४५५,६०० | ५१२ | २२ |
| ७ | सोलापूर | ७११,३०० | ४८१ | ३५ |
| ८ | चंद्रपूर | १६,३०० | ४२९ | १ |
| | **एकूण** | | | **१००** |

बाजरी

राष्ट्रीय सरासरी उत्पादकता २००६/०७ - ८८६ किलो / हेक्टर (गटाचा आकार ५०० हेक्टर)

| अ.क्र | जिल्हा | क्षेत्र हे. | उत्पादकता कि./हे. | गटसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | २५८,५०० | ७२५ | १९ |
| २ | नंदूरबार | १३,२०० | ६३१ | २ |
| ३ | अहमदनगर | २४३,९०० | ६११ | १८ |
| ४ | पुणे | १२८,९०० | ६३१ | ९ |
| ५ | सोलापूर | २७,५०० | २८० | २ |
| ६ | सातारा | ८४,५०० | २९२ | ५ |

www.mahaagri.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | सांगली | ९२,७०० | ३७८ | ७ |
| ८ | बीड | १८४,१०० | ८३७ | १६ |
| ९ | उस्मानाबाद | २०,००० | ५१० | २ |
| | **एकूण** | | | **८०** |

रागी (नागली)

राष्ट्रीय सरासरी उत्पादकता २००६/०७ - १२२६ किलो / हेक्टर (गटाचा आकार २५० हेक्टर)

| **अ.क्र** | **जिल्हा** | **क्षेत्र हे.** | **उत्पादकता कि./हे.** | **गटसंख्या** |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १५,८०० | ८०६ | ८ |
| २ | रायगड | १०,१०० | ७३५ | ४ |
| ३ | रत्नागिरी | १७,८०० | १,१४९ | ८ |
| ४ | नाशिक | ३६,००० | ७६१ | १६ |
| ५ | पुणे | १३,८०० | ६८५ | ४ |
| **एकूण** | | | | **४०** |

इतर लहान भरडधान्ये

राष्ट्रीय सरासरी उत्पादकता २००६/०७ - किलो / हेक्टर (गटाचा आकार १०० हेक्टर)

| **अ.क्र** | **जिल्हा -पिक** | **क्षेत्र हे.** | **उत्पादकता कि./हे.** | **गटसंख्या** |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक -बरटी | २,००० | ४२५ | २ |
| २ | नाश्कि -कटकी | २००० | ४२५ | १ |
| ३ | नाशिक- वरई | - | - | १ |
| ४ | ठाणे- राळा | - | - | २ |
| ५ | रायगड-राळा | - | - | २ |
| ६ | नाशिक-राळा | - | - | २ |
| एकूण | | | | १० |

**६) अतिमहत्वाचे**

**1)** भरडधान्य विकास योजनांचे प्रात्यक्षिके आयोजीत करतांना निवडलेल्या गटातील शेतक-यांचे पायाभुत सर्वेक्षण पुर्ण करुन यामध्ये संबंधीत शेतक-यांची वर्गवारीनुसार (अनुसुचित जाती/ जमाती, इ.) निवड करावी. तसेच महिला शेतक-यांचाही त्यांचे मानकांप्रमाणे निवड यादीमध्ये अंतर्भाव असावा. प्रकल्पनिहाय निवड केलेल्या शेतक-यांची यादी तालुका व मंडलस्तरावर ठेवण्यात यावी.

**2)** विद्यापिठाने शिफारशीत केलेले निविष्ठा पॅकेज निश्चीत केले असुन यात बदल करण्यात येवू नये. सदरच्या निविष्ठा संचालक (नि व गुनि) यांची बांधावर खत वाटप व बियाणे योजनेत दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

**3)** योजनेतील मंजूर लक्षांकास अनुसरून आयुक्तालय स्तरावरून बाबनिहाय दिलेल्या लक्षांकानुसार दिलेल्या योजनेची अंमलबजावणी करणेची आहे.

www.mahaagri.gov.in

4) विविध योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शेतकरी वाटा/हिस्सा याचा समावेश असून सदर हिस्सा क्षेत्रिय स्तरावर क्षेत्रिय कर्मचाऱ्यामार्फत शेतकऱ्यांकडुन घेतला जातो. हा हिस्स प्राप्त होताच सत्वर संबंधीत पुंरवठादार संस्थेकडे भरणा करणेसाठी कार्यालयात जमा करावा. याबाबत मा.आयुक्त यांचे कक्षामधून लेखा विषयक कार्यपद्घतीबाबत सविस्तर परिपत्रक निर्गमित केले आहे. शेतकरी वाटा कार्यालयात जमा करण्यास दिरंगाई हा अपहार समजून या बाबत विलंब आढळल्यास कार्यालय प्रमुखाने संबंधीताबाबत प्रशासकीय कार्यवाही करावी अन्यथा कार्यालय प्रमुखास जबाबदार धरणेत येवून या बाबत त्यांचे विरुध्द आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**७) प्रात्यक्षीकासाठी निविष्ठा कीट**

सदर कार्यक्रमातील भरडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत गट स्वरुपात प्रात्यक्षिके ही बाब अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मा. आयुक्त (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दि.९ एप्रिल २०११ रोजी विद्यापीठातील कृषि शास्त्रज्ञ व क्षेत्रिय अधिकारी यांची बैठक घेण्यात आली सदर बैठकीत झालेल्या चर्चास अनुसरुन १ हेक्टर क्षेत्रासाठी खालील प्रमाणे पिकनिहाय निविष्ठा कीट अंतिम करण्यात आलेले आहेत.

सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये संबधीत उपरोक्त प्रमाणे कृषि शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने अंतिम करण्यात आलेले निविष्ठा कीट नुसार निविष्ठांचा वापर करण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर सन २०१३-१४ या वर्षासाठी पिकनिहाय तेच कीट अंतिम करण्यात येत आहे. या कीट मध्ये आयुक्तालयाच्या परनानगी शिवाय कोणताही बदल करण्यात येऊ नये.

उपरोक्त पॅकेजमधिल सुक्ष्ममुलद्रव्य (झिंकसल्फेट), अझोटोबॅक्टर, पि.एस.बी. रासायनिक खते व डायमेथोएट, कार्बेनडेन्झीम या निविष्ठांचे सन २०१३-१४ मधिल निविष्ठानिहाय दर हे निविष्ठा पॅकेजमधील दर हे संभाव्य असुन अंतिम दर संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण यांनी निश्चीत केलेले दर लागू रहातील. सदरचे दरानुसार निविष्ठासाठी आर्थिक मर्यादेचे अधिन राहुन अनुदान संबंधीत निविष्ठा पुरवठादार संस्थेस देय राहिल. तसेच निविष्ठा पुरवठ्यापोटी अनुदान मर्यादेचे वरील रक्कम हि शेतकरी वाटा म्हणून संबंधीत क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वसूल करावयाचे असून पुरवठादार संस्थेकडे भरणा करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.

**८) प्रात्याक्षिकासाठी बियाणेः**

1) प्रात्याक्षिक क्षेत्रासाठी (प्रतिहेक्टर) पैकी ०.४० हेक्टर क्षेत्रासाठी १०० टक्के अनुदावर बियाणे मिनिकिट्स उपलब्ध करुन द्याव्यात. तथापि उर्वरीत क्षेत्रासाठी आवश्यक वाढीव बियाणे हे शेतकरी हिस्सा म्हणून त्याच वाणाचे बियाणे सोबत पुरवठा करावयाचे आहे. या प्रमाणे एक हेक्टर क्षेत्रासाठी आवश्यक असणारे बियाणे (मिनिकिट मध्ये दिलेल्या वाणाचे) शेतक-यास इतर निविष्ठा सोबत उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. वाढीव बियाण्यचा शेतकरी हिस्सा रक्कम तालुका कृषि अधिकारी यांनी शेतक-याकडून वसूल करुन जमा करावयाची असून बियाणे पुरवठा संस्थेस भरणा करावयाची आहे. या बाबतची जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. महाबीज मार्फत बियाण्यांचा पुरवठा न झाल्यास शेतकऱ्यांनी स्वतःचे बियाणे वापरल्यास बियाण्यापोटी कोणतेही अनुदान देय राहणार नाही.

www.mahaagri.gov.in

**९) योजनाअंतर्गत पुरवठा केलेल्या सर्व निविष्ठांचे प्रत्येक लॉटचे प्रत्येक तालुक्या मध्ये नमुने काढणे अनिवार्य आहे**

निविष्ठा प्राप्त होताच व वाटपाच्या पुर्वी प्रत्येक लॅाटनिहाय नमुने घेवून ते विश्लेषणासाठी अधिसुचीत शासकिय प्रयोगशाळेत पाठवावेत. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर फक्त प्रमाणीत नमुन्याच्या निविष्ठांचे देयके अदा करण्यात यावीत. या बाबत सविस्तर नोंदी ठेवण्यात याव्यात.

**१०) प्रात्यक्षिक (निविष्ठा पॅकेज)**

पीक- ज्वारी प्रति हेकटर – (रुपये ३,०००/- च्या मर्यादेत)

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १ | सुक्ष्म मुलद्रव्य - झिंक सप्ल्फेट | २५ कि.ग्रॅ. |
| २ | ॲझोटोबॅक्टर | २५० ग्रॅम |
| ३ | पीएसबी | २५० ग्रॅम |
| ४ | रासायनिक खते | |
| | सुफला (१५ : १५ : १५) | ३०० किलो |
| | युरिया | १०० किलो |
| ५ | पीकसंरक्षण डायमेथोएट | ५०० मि.ली |

पीकः- बाजरी प्रति हेकटर - (रुपये ३,०००/- च्या मर्यादेत)

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १ | सुक्ष्म मुलद्रव्य - झिंक सप्ल्फेट | २५ कि. ग्रॅ. |
| २ | ॲझोटोबॅक्टर | २५० ग्रॅम |
| ३ | पी. एस. बी. | २५० ग्रॅम |
| ४ | रासायनिक खते | |
| | सुफला (१५ : १५ : १५) | १५० किलो |
| | युरिया | ५० किलो |
| ५ | पीकसंरक्षण सायपरमेथ्रीन (२५ टक्के) | २५० मि.ली. |

पीकः- रागी (नागली) प्रति हेकटर - (रुपये ३,०००/- च्या मर्यादेत)

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १ | सुक्ष्म मुलद्रव्य - झिंक सप्ल्फेट | १२.५ कि. ग्रॅ. |
| २ | बोरॉन | ५ किलो |
| ३ | ॲझोटोबॅक्टर | २५० ग्रॅम |
| ४ | पी. एस. बी. | २५० ग्रॅम |
| ५ | बीज प्रक्रिया - कार्बेनडेझिंम | २० ग्रॅम |
| ६ | रासायनिक खते | |
| | सुफला (२० : २० : ०) | २०० किलो |
| | युरिया | ५० किलो |

पीक- इतर भरड धान्य (बरटी, कटकी, कोद्रा, वरई, राळा) प्रति हेकटर - (रुपये २,०००/- च्या मर्यादेत)

| अ.क्र. | घटक | प्रमाण |
|---|---|---|
| १ | अ‍ॅझोटोबॅक्टर | २५० ग्रॅम |
| २ | पी. एस. बी. | २५० ग्रॅम |
| ३ | बीज प्रक्रिया (कार्बेनडेझिंम) | २० ग्रॅम |
| ४ | रासायनिक खते | |
| | सुफला (२० : २० : ०) | १५० किलो |
| | युरिया | ५० किलो |

| अ.क्र. | पिक | प्रति हेक्टरी आवश्यक बियाणे मात्रा. किलो/हे. | केंद्र शासनाकडील ०.४० हे. क्षेत्रासाठी मंजूरी मिनिकिट किलो | लाभार्थी हिस्सा.किलो |
|---|---|---|---|---|
| १ | खरीप ज्वारी | १० | ४ | ६ |
| २ | रब्बी ज्वारी | १० | ४ | ६ |
| ३ | खरीप बाजरी | ४ | १.५ | २.५ |
| ४ | खरीप रागी | १० | ४ | ६ |
| ५ | इतर भरडधान्य | १० | ४ | ६ |

**११) प्रात्यक्षिकासाठी तंत्र सहाय्यकाची नेमणूक करणे**

या बाबी अंतर्गत पिक प्रैंत्यक्षिकाकरीता कषि पदवधारक/पदवीकाधारक व्यक्तीची तंत्र सहाय्यक म्हणून रू८०००/-दरमहा मानधनावर सहा महीन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.यासाठी ख.ज्वरी/बाजरी व रबी ज्वारी या पिकांकरीता-१००० हेक्टर क्षेत्राकरीता एक तंत्र सहाय्यक, नागली या पिकाकरीता-५०० हेक्टर क्षेत्राकरीता एक तंत्र सहाय्यक व इतर भरडधन्य या पिकाकरीता-२०० हेक्टर क्षेत्राकरीता एक तंत्र सहाय्यक याप्रमाणे संख्या निश्चित करून वि.कृ.स.सं यांनी पुरवठादार संस्थेमार्फत कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करावी.

प्रशिक्षण-

गटाचे तांत्रिक बळकटीकरण

| अ. क्र. | ज्वारी/बाजरी (गट ५०० हेक्टर ) | रक्कम |
|---|---|---|
| १ | गटप्रमुख प्रशिक्षण<br>२० शेतकयांच्या गटासाठी ---- १ गटप्रमुख गटप्रमुख संख्या ------ २५<br>गटप्रमुखांचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण<br>रु. १००/- प्रति दिन प्रति गटप्रमुख रुपये २५००/-<br>प्रशिक्षकांचे मानधन रु. ४००/- प्रति तज्ञ, २ तज्ञांसाठी रु. ८००/-<br>एकूण प्रशिक्षण खर्च रुपये ३३००/- | ६६००/- |

www.mahaagri.gov.i

| | | |
|---|---|---|
| | गटप्रमुखांचे प्रशिक्षण सख्यां - २ (हंगामपुर्व व मध्यावधी) | |
| २ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणूक व वितरणासाठी इमारत (३ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर ) | ५०००/- |
| ३ | प्रसिध्दी फलक,एकूण फलक संख्या ४ | २०००/- |
| ४ | प्रशिक्षण साहित्य, (माहितीपुस्तिका, घडीपत्रिका इत्यादी) | २०००/- |
| ५ | शेतीदिन कार्यक्रम | ८०००/- |
| ६ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवेस्थेतील फोटो व इतर) | १५००/- |
| एकूण खर्च | | २५०००/- |

**नागली**

| **अ.क्र.** | **प्रात्यक्षिक क्षेत्र (गट २५० हेक्टर )** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | गटप्रमुख प्रशिक्षण<br>२० शेतकयांच्या गटासाठी ---- १ गटप्रमुख<br>गटप्रमुख संख्या -------- १३<br>गटप्रमुखांचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण रु. १००/- प्रति दिन प्रति गटप्रमुख रुपये १३००/<br>प्रशिक्षकांचे मानधन रु. ४००/- प्रति तज्ञ, २ तज्ञांसाठी रु. ८००/-<br>एकूण प्रशिक्षण खर्च रुपये २१००/-<br>गटप्रमुखांचे प्रशिक्षण सख्यां - २ (हंगामपुर्व व मध्यावधी) | ४२००/- |
| २ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणूक व वितरणासाठी इमारत (२ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर ) | ३०००/- |
| ३ | प्रसिध्दी फलक,एकूण फलक संख्या २ | १०००/- |
| ४ | प्रशिक्षण साहित्य, (माहितीपुस्तिका, घडीपत्रिका इत्यादी) | १५००/- |
| ५ | शेतीदिन कार्यक्रम | ४०००/- |
| ६ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवेस्थेतील फोटो व इतर) | २८००/- |
| | **एकूण खर्च** | १७०००/- |

इतर भरड धान्य (बरटी, कटकी, कोद्रा, वरई, राळा)

| अ. | ज्वारी/बाजरी (गट १०० हेक्टर ) | रक्कम |
|---|---|---|
| १ | गटप्रमुख प्रशिक्षण | |
| | १० शेतकयांच्या गटासाठी --- १ गटप्रमुख गटप्रमुख संख्या --- १० ३६००/-<br>गटप्रमुखांचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण<br>रु. १००/- प्रति दिन प्रति गटप्रमुख रुपये १०००/-<br>शिक्षकांचे मानधन रु. ४००/- प्रति तज्ञ, २ तज्ञांसाठी रु. ८००/-<br>एकूण प्रशिक्षण खर्च रुपये १८००/- | ३६००/- |
| २ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणूक व वितरणासाठी इमारत<br>(२ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर ) | २०००/- |
| ३ | प्रसिध्दी फलक,एकूण फलक संख्या २ | १०००/- |
| ४ | प्रशिक्षण साहित्य, (माहितीपुस्तिका, घडीपत्रिका इत्यादी) | १५००/- |
| ५ | शेतीदिन कार्यक्रम | २५००/- |
| ६ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवेस्थेतील फोटो | २४००/- |
| | **एकूण खर्च** | १३०००/- |

**१३) बियाणे उत्पादन कार्यक्रमः-**

योजने अंतर्गत संकरीत व सुधरीत वाणाचे बियाणे उत्पादन कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असून या करीता कृषि विद्यापिठाने संशोधीत केलेले तसेच इतर शासकिय संस्थेने संशोधित केलेले संकरित व सुधारित वाणाचे पाच वर्षाच्या आतील अधिसुचित वाणाचे बियाणे उत्पादन उत्पादित करणे आवश्यक आहे.या करिता तालुका बिज गुणन केंद्र/ कृषि विज्ञान केंद्र /कृषि विद्यापिठ प्रक्षेत्र / कृषि विज्ञान मंडळ व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ इ.संस्थेमार्फत उत्पादीत करण्यात यावे. यासाठी संकरित वाणास रु.३०००/- व सुधारित वाणास रु.१०००/- प्रति क्विंटल अनुदान देय आहेत. यापैकी ७५ टक्के अनुदान हे बियाणे उत्पादकास व २५ टक्के अनुदान हे उत्पादन करणा-या संस्थेस हाताळणी व प्रक्रियेसाठी देय आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका बिज गुणन केंद्र / कृषि विज्ञान केंद्र , कृषि विज्ञान मंडळ , कृषि विद्यापिठ प्रक्षेत्र व महाबीज यांचेकडे होणारे एकत्रित बियाणे उत्पादन कार्यक्रमाचे नियोजन करुन कळवावे. तसेच उत्पादीत केलेले बियाणे बिज प्रमाणीकरण यंत्रणेकडून प्रमाणीत करून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी देयक सादर करावे.

**२.१५ निरिक्षणे :-**

www.mah

कृषि पर्यवेक्षकांनी प्रात्यक्षिकाचे प्लॅाट सोबत स्थानिक प्लॅाट (कंट्रोल प्लॅाट) बरोबर आयोजित करावी. प्रात्याक्षिकांच्या क्षेत्रात पूर्वी कोणते पीक घेतले होते, तसेच माती परीक्षणानुसार उपलब्ध अन्नद्रव्य याची देखील नोंद ठेवावी.या दोन्ही प्लॅाटमधील सविस्तर तुलनात्मक निरिक्षणे सोबतच्या प्रपत्रात ठेवण्यांत यावी. अंतिम निरिक्षणानुसार उत्पादनाची आकडेवारी घेवून त्याची रजिस्टरमध्ये नोंद करावी.

**१४) काढणी पश्चात तंत्रज्ञान व मुल्यवृध्दी**

स्वतत्रंरित्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी वेळापत्रक :

| अ. क्र. | बाब | खरीप अंतिम तारीख | रब्बी अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्पातील शेतक-यांचे पायाभुत सर्वेक्षण | १५ मे | १८ ते २० ऑगस्ट |
| २ | शेतकयांच्या गटांची निवड करणे व गटप्रमुखची निवड करणे | २० मे | २१ ऑगस्ट |
| ३ | प्रकल्प आराखडा तयार करणे (५०० हेक्टर) | २९ मे | २२ ते २४ ऑगस्ट |
| ४ | गटप्रमुखाचे प्रशिक्षण आयोजित करणे | ३१ मे | २५ ते ३० ऑगस्ट |
| ५ | प्रकल्पाची संकलित निविष्ठांची मागणी नोंदविणे | २५ मे | ३० ऑगस्ट |
| ६ | प्रकल्पातील लाभार्थि शेतक-यांस निविष्ठा व बियाणे वाटप | ५ जुन | ३० सप्टेंबर |
| ७ | अंतिम पेरणी अहवाल/प्रकल्प साध्य सादर करणे | २० जुलै | ३० ऑक्टोबर |
| ८ | पिकाच्या वाढीच्या अवस्थेतील फोटो व पीक परिस्थितीचा अहवाल देणे | दरमहा | दरमहा |
| ९ | पीक कापणी प्रयोगाचे आयोजन करणे | पीक परिपक्व झाल्यावर | डिसेंबर |
| १० | पीक निहाय उत्पादन व उत्पादकता सादर करणे | २० डिसेंबर | १५ फेब्रुवारी |
| ११ | निविष्ठा अहवाल/मासिक प्रगती अहवाल सादर करणे | प्रतिमहा | प्रतिमहा |
| १२ | प्रकल्पाच्या यशोगाथा सादर करणे | डिसेंबर २०१३ | मार्च २०१४ |

**१६) सनियंत्रण**

सदर योजनेचा मासिक प्रगती अहवाल खालील विहीत नमुन्यात (भौतिक लक्ष/साध्य व आर्थिक लक्ष/साध्य) दर्शवून नियमित न चुकता दरमहा पुढिल महिन्याच्या ५ तारखेपावेतो पाठविणे क्रमप्राप्त आहे. याबाबत जराही दिरंगाई/टाळाटाळ केल्यास किंबहुना या प्रकरणी भौतिक साध्य, विहित वेळेत साध्य न झाल्यास सदर बाबीचे अनुदान संबंधित जिल्हयास देय असणार नाही. याबाबत

www.mahaagri.gov.in

सदरचा कार्यक्रम विहित वेळेत पुर्ण न केले बाबत संबंधीत जि.अ.कृ.अ. यांना आयुक्तालयास स्पष्टिकरण देणे बंधनकारक राहिल.

१) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** – सदर योजना पुढे चालु ठेवनेसाठी सदर याजनेचे मुल्यमापन करणे क्रमप्राप्त असले बाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत यासाठी खलील मुदेनिहाय माहीती जसे १.प्रकल्पाचे आउटपुट. २.प्रक्ल्पाची फलनिश्पती. ३.प्रकल्प यशोगाथा.४.प्रकल्पांचे लाभधारकांची यादी खलील प्रपत्रात सॅफ्टकॉपीमध्ये सादर करणे क्रमप्राप्त आहे.

| अ.नं | जिल्हा | तालुका | शेतक-याचे नांव | क्षेत्र (हेक्टर) | वर्गवारी महिला/पुरुष | लाभार्थी वर्गवारी अ.जा./अ.ज. वि.जा.(अ) भ.ज.(ब)/(क) / (ड) वि.मा.प्र. खुला | भ्रमणध्वणी क्रं | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

२) योजनेतील प्राप्त निविष्ठांचे तपशिल व देयके अदायगी बाबतची खालील प्रपत्रात रजिस्टर मध्ये नोंदी घेऊनच देयके पारीत करावीत

| अ.क्र | निविष्ठांचे नांव | पुरवठा दिनांक | निविष्ठांची मात्रा (क्विंटल) | नमुना घेतल्याचे दिनांक | नमुना घेणा-या अधिका-यांचे नांव व हुद्दा | लॉट/बॅच नंबर | नमुना तपासणी करणा-या प्रयोगशाळांचे नाव | तपासणचा निष्कर्ष व दिनांक | देयकाची रक्कम | देयक अदायगी-बाबत सद्धस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

३) **उपविभागीय कृषि अधिकारी** – प्रकल्पातील प्रात्य.प्लॉटचे पिक कापणी प्रयोगाचे आयोजन व मुल्यमापण करणेची जबाबदारी राहील.तसेच कार्यक्षेत्रातील १० % तपासणी बंधनकारक आहे.

४) **तालुका कृषि अधिकारी** - निविष्ठा प्राप्त नोंद वही, निविष्ठा वाटप नोंद वही, देयक नोंदवही व्हिडीओ चित्रीकरण फोटोग्राफ्स व इतर अनुषंगीक नोंदी व १५ टक्के पीक प्रात्यक्षिकाची तपासणी करणे व तपासणी अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.

www.mahaagri.gov.in

५) **मंडळ कृषि अधिकारी** - निविष्ठा प्राप्त/वाटप नोंदवही, पेरणी नोंदवही, उत्पादन व उत्पादकता नोंदवही, माती परीक्षण नोंदवही, भेटपुस्तीका व इतर अनुषंगीक नोंदी व २५ टक्के पीक प्रात्यक्षिकाची तपासणी करणे व तपासणी अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.

६) **कृषि पर्यवेक्षक** - निविष्ठा प्राप्त/वाटप नोंदवही, पेरणी नोंदवही, उत्पादन व उत्पादकता नोंदवही, माती परीक्षण नोंदवही, भेटपुस्तीका, यशोगाथा, व्हिडीओ चित्रीकरण, फोटोग्राफ्स व इतर अनुषंगीक नोंदी व ५० टक्के पीक प्रात्यक्षिकाची तपासणी करणे व तपासणी अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.

७) **कृषि सहाय्यक -** निविष्ठा प्राप्त नोंद वही, निविष्ठा वाटप नोंद वही, प्रात्यक्षिक प्लाटच्या पेरणी बाबत अद्यावत नोंदी, प्लॉटनिहाय पिकाच्या वाढीच्या अवस्थेतील नोंदी, खताच्या दिलेल्या मात्रा, वेळोवेळी आपण वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटी व शेतकऱ्यांना केलेले मार्गदर्शन इत्यादी बाबत खात्याच्या विहीत नमुन्यातील नोंदी तसेच व्हिडीओ चित्रीकरण फोटोग्राफ्स व इतर अनुषंगीक नोंदी कृषि सहाय्यकांनी त्याच्या प्रक्षेत्रातील पीक प्रात्यक्षिकास १०० टक्के जबाबदारी राहिल. या बाबतचा तपशिल खालील प्रपत्रात ठेवण्यात यावा.

| **अ.क्र** | **शेतक-यांचे नांव** | **गांव** | **पीक** | **प्रात्य.क्षेत्र (हे.)** | **माती परिक्षण दि.** | **पेरणी दि.** | **पेरणीचे वेळी दिलेली खत मात्रा** | **पिक संरक्षण औषधे** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

| **वरिष्ठ अधिका-यांचे भेटीचा दिनांक व दिलेल्या सूचना** | **सूचनेनुसार केलेली कार्यवाही** | **पीक कापणी प्रयोग आयोजनाचा दिनांक** | **प्रात्यक्षिकांचे प्लॉटचे उत्पादन (किलो/हेक्टर)** | **तुलनात्मक प्लॉटचे उत्पादन (किलो/ हेक्टर)** | **सरासरी उत्पादनापेक्षा वाढ/घट** | **प्रकल्पाची फल निष्पत्ती** | **शेतक-याची स्वाक्षरी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | |

**सनियंत्रण** – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक हे प्रकल्पाचे समन्वयक व प्रमुख सनियंत्रक म्हणून काम पाहतील.

कृषि विभागाच्या विहीत कार्यप्रणालीनुसार प्रकल्पाची तपासणी करणे आवश्यक व तपासणी अहवाल वरीष्ठ कार्यालयास सादर करावा.

**१८) अभिलेख**

यासोबतच केंद्र भरडधान्य पिकांची पेरणी झालेपासून साप्ताहिक व मासीक प्रगती अहवाल आयुक्तालय स्तरावरुन शासनास विहित वेळेत नियमीत पाठविणे क्रमप्राप्त असल्यामुळै

www.mahaagri.gov.in

खालील विहिनमुन्यातील साप्ताहिक अहवाल कार्यालयीन कामकाजाचे शेवटच्या दिवशी न चुकता email ( insimp@rediffmail.com वर) /फॅक्स- ०२० २५५१२८१४/१७ अथवा प्रत्यक्ष कार्यालयीन दुतामार्फत सादर करणेबाबत दक्षता घ्यावी. सदरचा अहवाल आयुकतालयास प्राप्त झाल्यावर संबंधीत काम पाहणाऱ्या अधिकाऱ्याने खात्री करावी. सदरचा साप्ताहिक/मसिक अहवाल विहित वेळेत आयुक्तालयास प्राप्त न झाल्यास, राज्य/ केंद्र शासनास संबंधीत जिल्हयाचा प्रगती अहवाल निरंक पाठविण्यात येईल व या संबंधीची पुढिल सर्वस्वी जबाबदारी संबंधीत जि.अ.कृ.अ. यांची राहील. याची कटाक्षाने नोंद घ्यावी.यासंबंधी कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा केला जाणारनाही याची पुनःश्च नोंद घ्यावी.

पिकांचे पेरणीपासून वाढीच्या वेगवेगळया अवस्थेतील फोटोग्राप्स् / व्हिडीओ चित्रिकरण करावे. व त्यानुसार पिक प्रात्यक्षिकाच्या यशस्वीते बद्दलच्या यशोगाथा मराठी व इंगजीमधून सॉफ्ट व हार्ड कॉपीसह ५ प्रतित हंगाम संपताच तात्काळ आयुक्तालयास न चुकता सादर कराव्यात. खरीप हंगाम संपल्यानंतर प्रात्यक्षिक प्लॉटचे उत्पादन व उत्पादकता आयुक्तालयास कळविणे आवश्यक आहे. सदरची माहिती केंद्र शासनास सादर करावी लागते म्हणून प्रात्यक्षिकांचे आयोजन करतांना प्रात्यक्षिक प्लॉट व त्यास इतर तुलनात्मक प्लाट अशा पद्घतीने पेरणीपासून ते काढणीपर्यंत सविस्तर माहिती नोंद करुन शेवटी पिक कापणी प्रयोग आयोजनाबाबत कार्यवाही करावी.

**कृषि संचालक,**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे ४११ ००५**

www.mahaagri.gov.in

## कृषि आयुक्तालय, पुणे-५.

## Format no. 1

**Name of District: ........ Nodel officer for INSIMP: ........... Crop: ....................... Month .........**

| Sr No | Name of the District | Target Area {Ha} | sowing (Ha) | Variety/seed requirment (Seed rate 10kg/ha.) | Distribution of SEED MINIKITS: Nos Distributed | | Distribution of INPUT KITS: Nos. Distributed | Crop Status :Excellent(E): 100% Good (G):80% Normal:60% Average(AV)$ 50% poor: <30% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Kg. | Nos. | Qtl. | Nos. | |
| 1 | | | | | | | | |

## FORMAT-2

**INSIMP- Monthly Progress Report (Month-- - -- -2012) (Rs.in lakh)**

**Name of District : .....................** **Month: .......**

| Sr. No. | Component | Crop | Unit | phy | | Fin | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Target | Achieve | Target | Achieve |
| 1 | Demonstrations Kharif | Jowar | Ha. | | | | |
| | | Bajara | Ha. | | | | |
| | | Ragi | Ha. | | | | |
| | | Other | Ha. | | | | |
| | | **Total** | **Ha.** | | | | |
| | **Grand Total** | | | | | | |
| 2 | Minikits Kharif | Jowar | Nos. | | | | |
| | | Bajara | Nos. | | | | |
| | | Ragi | Nos. | | | | |
| | | Other | Nos. | | | | |
| | | **Total** | **Nos.** | | | | |
| | **Grand Total** | | | | | | |
| 3 | TA/PF for PP kharif | Jowar | Nos. | | | | |
| | | Bajara | Nos. | | | | |
| | | Ragi | Nos. | | | | |
| | | Other | Nos. | | | | |
| | | **Total** | **Nos.** | | | | |
| | **Grand Total** | | | | | | |
| 4 | Training -kh | Jowar | Nos. | | | | |
| | | Bajara | Nos. | | | | |
| | | Ragi | Nos. | | | | |
| | | Other | Nos. | | | | |
| | | **Total** | **Nos.** | | | | |
| | **Grand Total** | | | | | | |
| 6 | PHT Cluster with | Jowar | Nos. | | | | |
| | | Bajara | Nos. | | | | |

www.mahaagri.gov.in

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | EP/PF/NGO | Ragi | Nos. | | | | |
| | | Other | Nos. | | | | |
| | | **Total** | **Nos.** | | | | |
| 7 | TA for Cluster | Jowar | Nos. | | | | |
| | | Bajara | Nos. | | | | |
| | | Ragi | Nos. | | | | |
| | | Other | Nos. | | | | |
| | | **Total** | **Nos.** | | | | |
| 8 | Awarness & Market led Extension | | | | | | |

## FORMAT -3

Status of implementation for setting up processing clusters under INSIMP

| **Sr No** | **Activity** | **Status** |
|---|---|---|
| 1 | Indentification of agencies (List may be appended) | |
| 2 | Status of engagement of TAs for clusters | |
| 3 | Indentification of processing machines (Name of each machine) | |
| 4 | Status of fabrication (agency and procedure followed) | |
| 5 | Arrangement for tie up for supply of raw materialand marketing of end products. | |
| 6 | Follow up on inclusion of millets under "Mid-day Meal" programme. | |
| 7 | Schedule/material devloped for awarness campaign. | |

www.mahaagri.gov.in

## भरडधान्य विकास कार्यक्रम सन २०१३-१४

## निविष्ठा पुरवठा अहवाल

जिल्हा - माहे-- पिक -

| | | |
|---|---|---|
| अ) मंजुर गट संख्या - | क्षेत्र - | हे. |
| ब) प्रत्यक्ष पेरणी गटसंख्या - | क्षेत्र - | हे. |

| अ.क्र. | बाब | परीमाण | भौतिक | | आर्थिक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य |
| १ | बियाणे मिनिकीट | क्विंटल | | | | |
| २ | झिंक सल्फेट | मे.टन | | | | |
| ३ | फेरस | मे.टन | | | | |
| ४ | ॲझोटोबॅक्टर | मे.टन | | | | |
| ५ | पि.एस.बी. | मे.टन | | | | |
| ६ | युरीया | मे.टन | | | | |
| ७ | सुफला(२०/२०/०) | मे.टन | | | | |
| ८ | | लिटर | | | | |
| | एकूण | | | | | |
| गट बळकटीकरण | | | | | | |
| १ | शेतकरी प्रशिक्षण | संख्या | | | | |
| २ | गट प्रमुख प्रशिक्षण | संख्या | | | | |
| ३ | प्रशिक्षण सभागृह तथा निविष्ठा वितरण केंद्र | संख्या | | | | |
| ४ | प्रसिध्दी फलक | संख्या | | | | |
| ५ | प्रशिक्षण साहित्य | संख्या | | | | |
| ६ | शेतीदिन | संख्या | | | | |
| ७ | संकीर्ण | | | | | |
| ८ | इतर | | | | | |
| एकुण | | | | | | |

टिप- पीक निहाय स्वतंत्र अहवाल सादर करावा

www.mahaagri.gov.in